**ठळक बातम्या**

- महाराष्ट्राच्या विविध भागात पावसाचा जोर/ अनेक ठिकाणी धरणातल्या पाण्याचा विसर्ग, नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा, हिमाचल प्रदेशाच्या काही भागात मुसळधार पाऊस
- रालोआ सरकार अस्थिर असल्याचा अपप्रचार विरोधक करत असले तरी सरकार पाच वर्षं टिकेल, असा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा विश्वास
- ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं यजमानपद दिल्लीच्या सरहद संस्थेकडे
- मध्य प्रदेशात मंदिराची भींत कोसळून ९ लहान मुलांचा मृत्यू
- दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात श्रीलंकेचं भारतापुढं विजयासाठी २४१ धावांचं लक्ष्य, भारताची दमदार सुरुवात

  **आणि**

- पॅरिस ऑलिम्पिकमध्ये, पुरुष हॉकीच्या उपांत्यपूर्व फेरीत ग्रेट ब्रिटनवर मात करत भारताची उपांत्य फेरीत धडक

**<><><><><>**

मुंबईसह राज्यभरात आज पावसाचा जोर असून अनेक ठिकाणी धरणांमधला विसर्ग वाढवल्यामुळे नद्यांकाठच्या गावांमधल्या नागरिकांना प्रशासनानं सावधानतेचा इशारा दिला आहे. पुणे जिल्ह्यात खडकवासला धरणाच्या सांडव्यावरून मुठा नदी पात्रामध्ये सुरू असणारा विसर्ग वाढवून आजपासून ३५ हजार २ क्युसेक इतका केला आहे. पानशेत, वरसगाव आणि टेमघर या धरणांच्या पाणलोट क्षेत्रात, तसंच मावळ, मुळशी, वेल्हे आणि जुन्नर या तालुक्यांमध्ये मुसळधार पाऊस सुरु आहे. त्या परिसरातल्या धरणांमधूनही मोठ्या प्रमाणावर

विसर्ग सुरु आहे. पवना, इंद्रायणी आणि मुळा या नद्यांच्या पाणी पातळीत वाढ होत आहे. नदीकाठी बचाव कार्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवली असून तात्काळ मदतीसाठी राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाला शहरात पाचारण केलं आहे. उजनी धरण ९० टक्क्यांहून अधिक भरलं असून सोलापूर जिल्ह्यातही भीमा नदीकाठच्या गावांना सर्तकतेचा इशारा दिला आहे.

**धुळे** जिल्ह्यातल्या पांझरा नदीच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या पावसामुळे तसंच पांझरा, मालनगाव आणि जामखेडी प्रकल्पातून पाण्याचा येवा वाढल्यानं अक्कलपाडा धरणामध्ये पाण्याच्या साठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. त्यामुळे निम्न पांझरा मध्यम प्रकल्पातून आज दुपारी ३ हजार ५०० क्युसेक पाण्याचा विसर्ग करण्यात आला. पाण्याची आवक बघता विसर्ग वाढण्याची शक्यता असल्यानं पांझरा नदी काठच्या नागरिकांना खबरदारी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

**नाशिक** शहरासह जिल्ह्यात पावसाची संततधार सुरूच असून गंगापूर धरणातून दुपारी चार वाजता ४ हजार क्युसेक विसर्ग वाढवला असून सायंकाळी तो सहा हजार क्युसेक इतका करण्यात येणार आहे. दारणा धरणात, भावली, पालखेड या धरणांमधून विसर्ग सुरू असून जिल्ह्यातल्या सर्वच धरणांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. त्र्यंबकेश्वर इथं गावात आणि मंदिरात पाणी शिरलं आहे तर भाम धरणात पाण्याच्या विसर्गामुळे काकुस्ते गावात घरांमध्ये पाणी शिरलं आहे. या गावातल्या २२ कुटुंबांना अन्यत्र स्थलांतरीत केलं आहे. दरम्यान गोदावरी नदीला आलेल्या पुरात नाशिक शहरात रामकुंडाजवळ एक अभियंता पुराच्या पाण्यात वाहून गेला.

**अहमदनगर** जिल्ह्यात भंडारदरा धरणातून २७ हजार क्युसेक, तर निळवंडे धरणातून ७ हजार क्युसेक वेगानं पाणी सोडलं जात आहे.

**पालघर** जिल्ह्यात आज सकाळपासून पावसाची रिपरिप सुरु आहे. सततच्या पावसामुळे जिल्ह्यातल्या वैतरणा, पिंजाळ या नद्या दुथडी भरून वाहत असून या नद्यांनी आपली इशारा पातळी ओलांडली आहे. तर धामणी धरण, वांद्री, मोडकसागर, तानसा, मध्य वैतरणा धरण, कवडास बंधारा इत्यादी धरणांमधून पाण्याचा विसर्ग सुरु आहे.

**<><><><><>**

कोकण आणि घाट माथ्यावर तुरळक ठिकाणी आज जोरदार ते मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. विदर्भात आज तुरळक ठिकाणी जोरदार, तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. पुणे आणि सातारा जिल्ह्यांसाठी उद्यापर्यंत रेड अलर्ट दिला आहे.

या पार्श्वभूमीवर धोकादायक भागातल्या नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवावं, त्यासाठी एनडीआरएफ, एसडीआरएफ, सैन्याची मदत घ्यावी असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. बाधित लोकांसाठी निवारास्थाने, कपडे, जेवण इत्यादी सर्व व्यवस्था करण्यात यावी असे निर्देशही त्यांनी दिले आहेत.

**<><><><><>**

हिमाचल प्रदेशच्या काही भागात मुसळधार पाऊस सुरु आहे. गेल्या ३७ दिवसांत ढग फुटी, पूर आणि भूस्खनाच्या एकूण ४७ घटना घडल्या आहेत. राज्यात २२ ठिकाणी अचानक आलेल्या पुरामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. १७ ठिकाणी भूस्खलनाच्या घटना तर ८ ठिकाणी ढगफुटीच्या घटना घडल्या आहेत. या सर्व घटनांत १० जणांचा मृत्यू, ४ जण जखमी तर ४६ जण

बेपत्ता झाले आहेत. भूस्खलनाची शक्यता असलेल्या भागात पर्यटकांनी जाऊ नये, अशा सूचना हवामान विभागानं पर्यटकांना आणि नागरिकांना दिल्या आहेत.

<><><><><>

मोदी सरकार पूर्ण पाच वर्षं टिकेल, आणि २०२९ मधे पुन्हा रालोआ सरकारच सत्तेवर येईल  असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. चंदीगडमध्ये स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत बांधलेल्या २४तास पाणीपुरवठा प्रकल्पाचं उद्घाटन केल्यानंतर  ते बोलत होते. देशातल्या जनतेनं प्रधानमंत्री मोदी यांच्या कार्यावर विश्वास ठेवला आहे, मात्र विरोधक हे सरकार अस्थिर असल्याचा अपप्रचार करत आहेत, असं ते म्हणाले.

फौजदारी कायद्याच्या अंमलबजावणी प्रक्रीयेत न्यायव्यवस्थेला सहाय्यभूत ठरतील अशा विविध सेवांचं उद्घाटन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते झालं. इलेक्ट्रॉनिक स्वरुपातले पुरावे हाताळण्यासाठी न्याय सेतू, न्याय श्रुती आणि ई – समन्स या सुविधा उपलब्ध करुन दिल्या जाणार आहेत.

<><><><><>

९८ वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन यंदा दिल्लीच्या सरहद संस्थेत होणार आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळानं आज मुंबई मराठी साहित्य संघ इथं झालेल्या बैठकीत हा निर्णय घेतला. या संमेलनासाठी एकूण सात संस्थांनी निमंत्रण दिलं होतं. संमेलनासाठी जागा, निवास व्यवस्था, संस्थेचे मनुष्यबळ, पुस्तक प्रदर्शनाची जागा आदी मुद्द्यांचा विचार करून सरहद संस्थेची निवड केल्याची माहिती महामंडळानं दिली आहे.

<><><><><>

मध्य प्रदेशात, सागर जिल्ह्यातल्या शहापूर इथं आज सकाळी धार्मिक उत्सवादरम्यान हर्दूल बाबा मंदिराची भींत कोसळून झालेल्या दुर्घटनेत ९ लहान मुलांचा मृत्यू झाला, तर अनेकजण जखमी झाले आहेत. भिंतीखाली अडकलेल्या मुलांना बाहेर काढलं आहे. जखमींना रुग्णालयात दाखल केलं असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. मध्य प्रदेशाचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून, मृत्यूमुखी पडलेल्या मुलांच्या कुटुंबांना प्रत्येकी ४ लाख रुपये मदत जाहीर केली आहे.

<><><><><>

वायनाड इथं दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या ३०८ इतकी झाली आहे. अनेक जण अद्यापही बेपत्ता आहेत. सैन्य दल, भारतीय तटरक्षक दल, वायू सेना यांच्या मदतीने अद्यापही बचावकार्य सुरू असून पाच जणांना वाचवण्यात यश आलं आहे. मातीच्या ढिगाऱ्यात अद्यापही काही मृतदेह असण्याची शक्यता वर्तवण्यात येत असून त्यांच्या शोधासाठी श्वानपथकाला पाचारण करण्यात आलं आहे. शोधात सापडणारे मृतदेह प्रशासनाच्या ताब्यात देण्यात येत आहेत.

<><><><><>

कोलंबो इथं सुरू असलेल्या दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात श्रीलंकेनं भारतापुढं विजयासाठी २४१ धावांचं लक्ष्य ठेवलं आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेनं ९ गडी गमावून २४० धावा केल्या. भारतातर्फे वॉशिंग्टन सुंदरनं ३, तर कुलदीप यादवनं २ बळी घेतले.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारतानं २० षटकात ४ बाद १२८ धावा केल्या होत्या.

<><><><><>

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज पुरुष हॉकीच्या उपांत्यपूर्व फेरीत ग्रेट ब्रिटनचा पेनल्टी शूटआऊटमध्ये ४-२ अशा गोलफरकानं पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. बॅडमिंटनमध्ये मात्र भारताच्या लक्ष्य सेनला उपांत्य फेरीत टोक्यो ऑलिम्पिकचा सुवर्णपदक विजेता व्हिक्टर ॲक्सेलसेन याच्याकडून थेट गेम्समध्ये पराभव पत्करावा लागला. दुसरीकडे महिलांच्या मुष्टियुद्ध स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत ७५ किलो वजनी गटात चीनच्या ली क्वियान हिनं टोक्यो ऑलिम्पिकची पदकविजेती लोव्हलीना बोर्गोहाइन हिचा ४-१ असा पराभव केला.

<><><><><>

ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्त्या शोभना रानडे यांचं आज सकाळी पुण्यात निधन झालं. त्या १०० वर्षांच्या होत्या. शोभना रानडे यांनी निराधार महिला आणि मुलांसाठी समाजकार्य केलं. भारत सरकारनं २०११ मध्ये त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना पद्मभूषण पुरस्कार देऊन सन्मानित केलं होतं.

<><><><><>

अन्य राज्यातून बी ए एम एस केलेल्या महाराष्ट्रातल्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर आयुर्वेदिक शिक्षणासाठी राज्याच्या कोट्यातून प्रवेश देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. मुंबईत काल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांच्यासोबत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. यावेळी मुख्यमंत्र्यांनी वैद्यकीय शिक्षण प्रधान सचिव दिनेश वाघमारे यांना पदव्युत्तर प्रवेश नियमांत आवश्यक ते बदल करून मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश दिले. या विद्यार्थ्यांना आता राज्याच्या शासकीय आणि खाजगी अनुदानित ८५ टक्के तसंच खाजगी विना अनुदानित ७०टक्के कोट्यातून प्रवेश घेता येणार आहे.